नियमीत फौजदारी खटला क्र.९४/२०२३

निशाणी क्र.२६

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. (०१)**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,**

**माझे नांव** :- सतीश आश्रोबा चव्हाण,

**माझे वय** :- २७ वर्ष

**माझा व्यवसाय** :- शेती,

**माझा रहिवास** :- रहेमान नगर, पहीली गल्ली, सेलू, जि. परभणी.

**सरतपास**

**अभियोगपक्षा करिता श्री आय.ए.पठाण, विशेष सहाय्यक सरकारी वकील**

०१. घटना सन २०२३ मध्ये संध्याकाळी ५:०० वाजता गल्लीत माझ्या घरासमोर घडली. त्यावेळी माझा लहान मुलगा हर्षद घरासमोर खेळत असताना त्याला आरोपी क्र.१ चा मुलगा सोनु याने मारहाण केली. त्यावर मी आरोपी क्र.२ व ३ यांना सांगीतले असता त्यांनी मला शिवीगाळ केली. त्यांनी माझ्या आईला केस ओढुन मारले. आरोपी क्र.१ ने माझ्या डोक्याला धरुन भिंतीवर डोके आपटले. अब्बास भाई व अलाउद्दीन भाई यांनी सोडवासोडव केली. त्यानंतर दवाखान्यात गेलो. उपचार घेऊन मी पोलीस ठाण्यात गेलो. तेथे मी आरोपींविरुध्द फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. फिर्यादला **निशाणी पी.२७/स.सा.१** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी पी.२८/स.सा.१** देण्यात येते. मी आरोपींना ओळखतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**... सरतपास पुर्ण.**

**उलटतपास**

**<u>आरोपींकरीता श्री.ए.डी.कुरेशी, वकील.</u>**

०२. मी अशिक्षीत आहे. हे खरे आहे की, मला लिहीता वाचता येत नाही. मला फक्त सही करता येते. मी शेतात कामाला जातो. सध्या मी गंगाधर शेरे यांच्या शेतात महिन्याने कामाला आहे. मी जन्मापासुन रहेमाननगर मध्ये राहातो. मला नितीन नावाचा एक भाऊ आहे.

०३. माझे आईवडील कामानिमित्त मुंबईला कामानिमित्त जात येत असतात. घटनेच्या वेळी माझा मुलगा हर्षद सहा वर्षांचा होता. मी राहातो ते घर माझ्या वडीलांच्या नावावर आहे. घटनेच्या वेळी पश्चीमेस कलाबाई धापसे, पुर्वेस आरेफ, दक्षिणेस अकबर व उत्तरेस रस्ता व त्यपलीकडे बोरकर यांचे होस्टेल आहे.

०४. घटनेच्या वेळी मी घरामध्ये बसलेलो होतो. आरोपी क्र.१ व २ परतुर येथे राहातात किंवा कसे ते मला माहीत नाही. मी मागील १० ते १२ वर्षांपासून बाहेरगावी शेतात जाऊन काम करतो. आमचे भांडण अर्धा ते पाऊन तास चालले. घटनेच्या वेळी १० ते १२ लोक घटनास्थळी जमा झाले होते. हे खरे आहे की, माझ्या घराच्या आजुबाजुच्या माझ्या व मुस्लीम समाजाची घरे आहेत.

०५. हे खरे नाही की, घटनेच्या वेळी माझ्या घरासमोरील रस्ता कच्चा ओबडधोबड होता. सांडपाण्यासाठी शोश खड्डा केलेला आहे. घटनेपूर्वी माझे आरोपींसोबत भांडण झाले नव्हते. घटना १४ एप्रील २०२३ रोजी घडली. त्यादिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती होती. आम्ही बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला वंदना करण्यासाठी सकाळी १०:०० वाजता येऊन १२:०० वाजेपर्यंत परत गेलो होतो.

०६. मला दारु पिण्याची सवय आहे. हे खरे नाही की, मी घटनेच्या दिवशी दारु पिलेलो होतो. मी पोलीस ठाण्यात गेलो त्याची नेमकी वेळ माझ्या लक्षात नाही. त्यावेळी माझ्यासोबत माझी आई, पत्नी व मुलगा होता. त्यांच्याशिवाय इतर कोणीही माझ्यासोबत नव्हते. फिर्याद देतेवेळी मला आरोपी व त्याच्या वडीलांचे नाव माहीत होते आडनाव माहीत

नव्हते. फिर्याद देताना अन्वर पठाण माझ्यासोबत पोलीस ठाण्यात नव्हते.

०७. हे खरे आहे की, पोलीसांनी फिर्याद टंकलीखीत करुन छपाई करुन मला सही करण्यास सांगीतले. हे खरे आहे की, पोलीसांना घटनाक्रम माझ्या आईने सांगीतला व मी फिर्यादवर सही केली.

०८. हे खरे नाही की, मी दारु पिऊन खड्यात पडल्याने मला मार लागला. हे खरे नाही की, आरोपी क्र.२ व ३ यांनी आईला केस धरुन मारहाण केली नाही. हे खरे नाही की, घटनेच्या वेळी मी माझ्या पत्नीसह काम करतो त्याठिकाणी शेतात राहात होतो. हे खरे नाही की, माझे आईवडील घटनेच्या वेळी मुंबईला कामाला गेले होते. हे खरे नाही की, मी घटनेनंतर दवाखान्यात गेलो नाही. हे खरे नाही की, मी सरतपासात सांगतो तशी घटना घडली नाही. हे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**... उलटतपास पूर्ण.**

**... फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

(**व्ही.आर.गटकळ**)

दिनांक: १९/०६/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

न्यायालय क्र.०२ सेलू.